Peer Reviewed Journal

ISSN 2319-8648

Impact Factor (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

International Peer Reviewed Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Special Issue 20 Vol. I
on

## भारतीय समाज और विकलांग (दिव्यांग) विमर्श

## Indian Society & Ideology of Disability

October 2019

Associate Editor
Dr. Shivaji Wadchkar

Guest Editor
Principal Dr. V.D. Satpute

Assistant Editor
Dr. V.B. Kulkarni
Dr. A.K. Jadhav
Dr. S.A. Tengse

www.publishjournal.co.in

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue XX , Vol. I
Octomber 2019

Peer Reviewed
SJIF

ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

# Index

1. अपंगत्व (दिव्यांग) : प्रतिबंधात्मक उपाय, उपचार आणि पुनर्वसनाचे साधने — १
प्रा. डॉ. विलास घोडे

2. अपंग व्यक्तींच्या सक्षमीकरणात प्रशासनाची भूमिका — १८
प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे)

3. अपंगत्वः स्वरूप,प्रकार व यशस्वी व्यक्ती — 23
प्रा. सखाराम बाबाराव कदम

4. मराठीतील अपंग साहित्य प्रवाह : अभिसरण आणि मूल्यभान — 26
प्रा.अरविंद रा.जाधव

5. दिव्यांग व्यक्तीचे प्रकार : एक अभ्यास — 32
प्रा. नवनाथ बंकट बडे,

6. विकलांग व्यक्तिंचे मराठी कादंबरीतून आलेले चित्रण — 36
प्रा. देशमुख बिभीषण

7. अपंग व्यक्तींचे प्रकार आणि अपंगत्वाचे व्यवस्थापन — ४२
प्रा. डॉ. जाधव अशोक काकासाहेब

8. दिव्यांगाचे पुनर्वसन एक सामाजिक आव्हान — ४६
प्रा. गंगाधर चव्हाण

9. मानसिक विकलांगता — ४९
डॉ. घोडके अरविंद अंबादास

10. दिव्यांग स्त्रियांची समाजिक स्थिती — 51
प्रा.ज्ञानेश्वर किसान म्हात्रे

11. भारतीय समाजातील अपंगाची स्थिती — 57
डॉ.सुनिता आत्माराम टेंगसे

12. दिव्यांगासाठी शासनाच्या योजना — ६१
प्रा. डॉ. एम.डी.कच्छवे

13. दिव्यांगासाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजना — 65
प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार

14. यशस्वी अपंगत्व — 70
प्रा. डॉ.अंबादास पांडुरंग बर्वे

CURRENT GLOBAL REVIEWER

Special Issue XX, Vol. I
Octomber 2019

Peer Reviewed
SJIF

ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

# अपंग व्यक्तींचे प्रकार आणि अपंगत्वाचे व्यवस्थापन

**प्रा. डॉ. जाधव अशोक काकासाहेब**
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि. परभणी

वर्तमान काळात अपंगत्व समाजापुढील एक ज्वलंत समस्या आहे. अपंगांना मदत करण्यासाठी अनेक शासकीय व निमशासकीय संघटना तत्पर आहेत. अपंग व्यक्तिंची समाजामध्ये एक वेगळी ओळख व स्थान आहे. त्यांना नेहमी कमी लेखले गेले. प्राप्त ऐतिहासिक पुराव्यानुसार अपंगांना राक्षस, पुर्वजन्मीचे पाप, कपटी असे संबोधुन ठार केले जात असत. त्यांना हसन्याचे पात्र समजून त्यांच्यावर भर दरबारात कोरडे ओढले जात होते. जनावरांच्या मागे बांधून फरफटत नेले जात होते. त्यांचा प्रभाव इतर समाजावर होवू नये म्हणून त्यांना गाव किंवा शहरापासून वेगळे ठेवले जात होते. 12 व्या शतकानंतर अपंगाप्रती लोकांच्या दृष्टिकोनात बदल झाला आणि अपंगांना समाजाचे अभिन्न अंग मानले जाऊ लागले. त्यांना विषेश सेवा देण्यात येऊ लागल्या. भारतात 5 हजार वर्षापुर्वी अपंगांना आदराने वागविले जात होते याची चिकित्सा व चर्चा उपनिषद् आणि ग्रंथामध्ये दिसून येते. 4 थ्या शतकात अपंगासाठी आश्रमाची व्यवस्था होती. 17 व्या शतकात त्यांच्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण व त्यांची देखरेख इ. कडे लक्ष देण्यास प्रारंभ झाला. वर्तमान काळाला शैक्षणिक पुनर्जन्माचा काळ म्हटले जाते. शिक्षणामुळे अपंगांना समाजात चांगला दर्जा मिळण्यास सुरूवात झाली. 17 व्या शतकात पॅरिसचे अम्बेचार्ल्स, माइकल व सॅम्युअल इ. नी हातचलित संकेत पद्धतीचा शोध लावला. त्यामुळे अंधांसाठी शाळांची स्थापना करण्यात आली. हळुहळू मानसिक विकलांगाकरिता प्रशिक्षण देण्यात येवू लागले. अशा प्रकारे 19 व्या शतकापर्यंत शिक्षण व प्रशिक्षणाचे नवनवीन शोध लावले. या काळात एलेक्झांडर, ग्राहम बेल, आल्फ्रेड ब्राइनर व मारिया मॉंटेसरी इ. चे योगदान महत्वपूर्ण ठरले. याच काळात अपंगासाठी पुस्तके लिहिली जाउ लागली. तसे पाहिले तर 20 व्या शतकात मानसिक मतिमंद व्यक्तिसाठी विषेश शाळा स्थापन केल्या. याच काळात रॉयल कमीशन पास झाले ज्याला मेंटली डिफीशियन्सी नावाने ओळखले जाते. नंतर अनेक कायदे केले गेले. यात सन 1885-86 मध्ये लॉर्ड ईगटन कमीशन यामध्ये बहिरे व अंध व्यक्तिंसाठी शिक्षणाची व्यवस्था केली गेली. 1903 मध्ये लंडन कमीशनने मतीमंदासाठी शिक्षणाची व्यवस्था केली. 1959 मध्ये ब्रिटनने मेंटल हेल्थ ॲक्ट बनविला. भारतात 1968 मध्ये राष्ट्रिय शिक्षण धोरणामध्ये अपंगासाठी शिक्षणाची व्यवस्था केली. 1996 मध्ये IDIA (International Disabled Education Act) बनविला ज्यात प्रत्येक अपंग मुलांना शिक्षण - प्रशिक्षण देण्यासाठी वैयक्तिक प्रशिक्षण कार्यक्रम तयार करण्यात आले. भारतात 1985 मध्ये भारतीय पुनर्वसन परिषदेची स्थापना करण्यात आली. 1995 मध्ये अपंग अधिनियम पास झाला. ज्यात अपंगांना समान संधी, पुर्ण भागीदारी व अधिकाराचे संरक्षण देण्यात आले. 1999 मध्ये राष्ट्रिय न्यास अधिनियम अमलात आला. ज्यात मतीमंद, पक्षाघात व बहुविकलांगाचे संरक्षण व पुनर्वसनाची तरतुद केली गेली.

**उद्देशः-** प्रस्तुत शोधनिबंध खालील उद्देशाला अनुसरून लिहिण्यात आला आहे.

1) अपंगत्वाचा अर्थ पहाणे व सांखिकीय माहिती स्पष्ट करणे.

2) अपंगत्वाचे प्रकार स्पष्ट करणे.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue XX , Vol. I | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Octomber 2019 | SJIF | Impact Factor : 7.139


3) अपंगत्वाविषयी सर्वसामान्यांना अवगत करणे.

4) अपंगाच्या पुनर्वसनाबाबत उपाय-योजना सुचविणे.

**अभ्यास पद्धती -**

प्रस्तुत शोध निबंध लिहीण्यासाठी दुय्यम साधन सामग्रीचा अवलंब करण्यात आला आहे. यात विविध ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, मासिके, दै. वर्तमान पत्रे व संकेत स्थळे इ. चा समावेश आहे.

**अर्थ-**

अपंगत्व म्हणजे, व्यक्तिची जन्मजात किंवा तद्नंतर उद्भवलेली शारिरिक दुर्बलता किंवा कमजोरी होय. शारिरिक हानीमुळे व्यक्तीच्या कार्यक्षमतेत कमतरता येते. एखाद्या व्यक्तीचे अपंगत्व म्हणजे अशी परिस्थिती की, ज्यात व्यक्तीचे वय, लिंग, सामाजिक व सांस्कृतिक स्तरावर त्याला जी कार्ये करण्याची अपेक्षा आहे ती कार्ये करित असताना तो असमर्थ ठरतो किंवा काही अडचणी निर्माण होतात या स्थितीला अपंगत्व असे म्हणतात. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हटले तर, अपंग व्यक्ती चालणे, बोलणे, पहाणे, लिहिणे, वजन उचलणे, समजने व समजून घेणे, निर्णय घेणे किंवा जवळपासच्या वस्तू आणि व्यक्तींच्या आवडीमध्ये समस्या निर्माण होणे म्हणजे अपंगत्व होय.

संपुर्ण जगात अपंगाची संख्या दर दिवसाला वाढत आहे. अपंगाच्या अधिकाराचे सक्षण व्हावे, त्यांचा दर्जा उंचावणे, त्यांना जगण्यास प्रेरणा मिळावी, त्यांच्या समस्यांची समाजाला जाण व्हावी या उद्देशाने 3 डिसेंबर हा जागतिक अपंग दिन म्हणून साजरा केला जातो. जगात जवळपास 15 करोड लोक नेत्रहीन आहेत. , 135 करोड लोक अल्पदृष्टी दोषाने त्रस्त आहेत. 123 करोड लोक बहीरे आहेत तर मतीमंदांची व्यापकता दर 30 हजार प्रति व्यक्ती एवढी आहे. यावरून असे स्पष्ट होते की, एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात अपंग व्यक्तिंची संख्या मोठ्या प्रमाणात असून त्यांचे पुनर्वसन होणे अत्यंत आवश्यक आहे.

भारतातील अपंगाबाबत एक धक्कादायक माहिती समोर येते. ती म्हणजे 5 ते 19 वयोगटातील 17.01 % अपंग विद्यार्थी आतापर्यंत एकदाही शाळेत गेले नसल्याचे दिसून येते. युनेस्कोने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या 2011 च्या जनगनणेच्या आधारे आपल्या अहवालातून असे निष्कर्ष काढले आहेत की, राष्ट्रीय स्तरावर 27.00% अपंग विद्यार्थी एकदाही शाळेत गेलेले नाहीत. आसाममधील विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक असून ते 36.04 % एवढे आहे. महाराष्ट्रात 6 लाख 84 हजार 328 अपंग विद्यार्थी असून त्यापैकी 17.01 % विद्यार्थी एकदाही शाळेत गेले नसल्याचे तर कधीतरी शाळेत गेलेल्या मुलांचे प्रमाण 12.06 % एवढे आहे. अपंग विद्यार्थी शाळेत जाण्याच्या प्रमाणात महाराष्ट्र राष्ट्रीय स्तरावर तिसऱ्या स्थानी आहे. पहिल्या स्थानी गोवा असून त्याचे प्रमाण 73.02 % एवढे आहे. वरिल राज्ये वगळता जवळपास सर्व राज्यामध्ये शाळेत न गेलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण 20.00 % हुन अधिक आहे. अपंगत्वाचे मुख्य प्रकार पुढील प्रमाणे आहेत.

1) दृष्टिदोष 2) कर्णबधिर 3) मतीमंद 4) मानसिक दुर्बलता

5) वाचादोष 6) अस्थिव्यंग 7) बधिरता/बहुविकलांग 8) कुष्ठरोग

9) सिक्लसेल

**अपंगांचे व्यवस्थापन-**

भारतातील दिव्यांग व्यक्तींचे वेळोवेळी व्यवस्थान होणे फार गरजेचे आहे. आतापर्यंतच्या दिव्यांग व्यवस्थापनाचा विचार केला तर असे दिसून येते की, दिव्यांग व्यक्तींना शासनाच्या विविध योजनांचा ज्या प्रमाणात लाभ मिळणे आवश्यक होते त्या प्रमाणात लाभ मिळाले नसल्याचे दिसून येते. बऱ्याच दृष्टिदोष, कर्णबधीर व हातापायाने अपंग व्यक्ती शासकीय लाभापासून वंचीत आहेत. त्यांना शासकीय कार्यालयाकडून योग्य ती वागणूक दिली जात नाही. तेव्हा दिव्यांगाची एकूण आकडेवारीचा शोध घेवून त्यांना आवश्यक त्या सेवासुविधा पुरविणे गरजेचे आहे.दिव्यांगाच्या व्यवस्थापनाबाबत पुढीलप्रमाणे महत्वाचे मुद्दे स्पष्ट करता येतात.

1) **आरक्षण -** दिव्यांगांना नोकरीतील दिले जाणारे आरक्षण व त्याचे नियमांचे काटेकोरपणे पालन होताना दिसून येत नाही. दिव्यांगाच्या पदावर इतर कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करण्यात येवू नये. बऱ्याचदा जाणीवपुर्वक दिव्यांग व्यक्तीच्या जागा भरल्या जात नाहीत किंवा दिव्यांग व्यक्ती मिळत नसल्याचे सांगून इतर व्यक्तीची नेमणूक केली जाते. मुलाखतीवेळी त्यांचा अपमान केला जातो, त्यांना योग्य ती वागणूक दिली जात नाही.

2) **शिक्षण -** वरिल आकडेवारीवरून असे दिसून येते की, बहुतांश दिव्यांग मुले शिक्षणापासून वंचित आहेत. त्या कारणांचा शोध घेउन ते शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच दृष्टिदोष असलेल्या मुलांना संगीत, संगीत वाद्यांची दुरूस्ती, टंकलेखन, वेतकाम, खुर्च्या तयार करणे, ब्रश तयार करणे, खडू तयार करणे, चर्मकला, विणकाम, भरतकाम इ. चे शिक्षण व प्रशिक्षण दिले जाणे आवश्यक आहे.

3) **आरोग्य -** गरोदर महिलांचे आरोग्य उत्तम राहिल याचे योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. कारण बहुतांश मुले आईच्या अनारोग्यामुळे अपंग म्हणून जन्मास येतात. शासनाने गरोदर महिलांचे आरोग्य चांगले राहिल याकरिता महिलांना आरोग्याविषयक उत्तम दर्जाच्या सेवासुविधा देणे आवश्यक आहे.

4) **प्रवास -** प्रवासी वहातुकीच्या शासकीय बसेस व रेल्वेमध्ये अपंगांना आरक्षण दिले जाते. परंतू त्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नाही. अपंग व्यक्तींना पोलिस व दक्ष नागरिकांनी मदत करणे आवश्यक आहे. तसेच खाजगी बसेसमध्येही आरक्षण लागू करणे गरजेचे आहे. शासकीय कार्यालयामध्ये अपंगासाठी रँप, गाडा किंवा लिफ्टची व्यवस्था दिसून येत नाही. असल्या तरी त्या सुविधा वापरात नसतात. त्यामुळे अपंगांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. तेव्हा वरिल सुविधामध्ये सुधारणा व बदल होणे अपेक्षित आहे.

5) **कृत्रिम अंग -** अपंगासाठी दिले जाणारे कृत्रिम अंग हे आधुनिक पद्धतीची असली पाहिजे. कृत्रिम अंगामध्ये अलिकडे मोठ्या प्रमाणात सुधारणा झाल्या आहेत. सुधारित कृत्रिम पाय, हात, काठ्या, गाडी किंवा इतर अंग व साहित्य अपंगांना मिळणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातीला अपंग व्यक्तीपर्यंत असे साहित्य क्वचितच पोहचते. तेव्हा ते साहित्य पुरविण्यासाठी प्रत्येक जिल्हा स्तरावर स्वतंत्र यंत्रणा असावी.

6) **निवास व्यवस्था -** अपंगासाठी शासनाने कायम स्वरुपी निवास व्यवस्था करणे आवश्यक आहे. कारण अपंग शारीरिकदृष्ट्या सक्षम नसतो. तसेच तो कुटूंबातील व्यक्तीला अतिरिक्त भार आहे असे वाटते. त्यामुळे अपंग व्यक्तीसमोर निवासाची समस्या निर्माण होते. म्हणून शासनाने अपंगासाठी निवास व्यवस्था करणे गरजेचे आहे.

7) **रोजगार** - अपंगासाठी रोजगाराच्या ज्या विशेष योजना आहेत त्या अपंगापर्यंत पोहचविणे आवश्यक आहे. त्यांना विविध वस्तु तयार करण्याचे प्रशिक्षण देवून त्यांना शासनाने अर्थ सहाय्य करणे आवश्यक आहे. तसेच अपंगासाठी शासकीय नोकरीप्रमाणे खाजगी व्यवसायातही काही जागा आरक्षित ठेवल्या पाहिजे.

8) **अपंगाचे अनुदान** - देशात मोठ्या प्रमाणात अपंगासाठी शाळा आहेत. परंतू त्यांना दिले जाणारे अनुदान हे नियमीत प्राप्त होत नाही. प्राप्त झाले तरी त्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याचे दिदसून येते. तेव्हा अपंग व्यक्तींना दिले जाणारे अनुदान, शाळांना दिले जाणारे अनुदान यात नियमीतता असावी आणि भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यात यावे.

सारांश, अपंग व्यक्तींना स्वतःच्या पायावर उभे राहता येईल यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थातील 3% निधी अपंगावर खर्च करण्याची तरतूद आहे. यामध्ये पिठाची गिरणी, शिलाई मशिन, झेरॉक्स मशिन व लॅपटॉप यावर निधी खर्च करणे बंधनकारक आहे. मात्र त्याची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे अपंगावर अन्याय होतो. हिच अवस्था नगर पंचायत, नगर पालिका व महानगरपालिकामध्ये दिसून येते.

स्टिफन हॉफ्किन्स या व्यक्तीने अपंगावर मात करित आयुष्यभर जगाच्या कल्याणार्थ विविध शोध लावले. एक अपंग व्यक्ती काय करू शकतो हे याचे उत्तम उदाहरण आहे. तशा भारतातही अनेक महान अपंग व्यक्ती आहेत. त्या अपंगावर मात करून विश्वविक्रम करित आहेत. जसे सुधा चंद्रन नृत्यांगनेत पारंगत आहेत, गिरिश शर्मा बॅडमिमंटनमध्ये अव्वल आहे, शेखर नाईक उत्तम क्रिकेटर आहे त्याने अनेक शतकं आपल्या नावावर नोंदवली, साईप्रसाद विश्वनाथन हा कंबरेपासून खाली लुळा आहे पण तो एक उत्तम स्काय ड्रायव्हर आहे. त्याने 1400 फुट उंचीवरून ड्रायव्हिंग करून लिम्बका बुक ऑफ वर्ल्ड मध्ये रेकॉर्ड केले. थोडक्यात अपंगांनी जीवनात नाउमेद न होता जीवन जगले पाहिजे. अपंगाबाबत शासनाने अनेक योजना व कार्यक्रम आखले आहेत. परंतू त्याची योग्य अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे. एकही अपंग आपल्या हक्कापासून वंचित राहणार नाही याची शासन व प्रशासनाने दखल घेण्याची गरज आहे. कारण अपंग व्यक्ती म्हणजे कुटूंबावर पडलेला अतिरिक्त बोजा आहे. अशी समाजाची मानसिकता बनलेली आहे. त्यामुळे शासन, प्रशासन व सेवाभावी संस्था यानी अपंगाचे कायमस्वरूपी पुनर्वसन होईल असे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**संदर्भ -**

1) डॉ. मिश्र दयाकृष्ण, डॉ. राठौड ए. एस. 1998 सामाजिक प्रशासन, (Social Administration) कॉलेज बुक डेपो, जयपुर
2) डॉ. जोसेफ आर. ए. 2005 पुनर्वास के आयाम, समाकलन पब्लिशर्स, वाराणसी
3) कौल जे. एल. शिक्षक - प्रशिक्षण - लेखमाला, ऑल इंडिया कन्फेडरेशन ऑफ दि ब्लाइंड, दिल्ली
4) डॉ. फडिया बी. एल. - डॉ. फडिया कुलदिप 2007 उच्चतर लोकप्रशासन, साहित्य भवन पब्लिकेशन्स, आग्रा
5) मासिके - लोकराज्य, योजना, कुरुक्षेत्र
6) संकेत स्थळे व दैनिक वर्तमानपत्रे